# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025


Original Article

# मराठी सामाजिक संस्कृती आणि संविधान


**डॉ.प्रा. पुरुषोत्तम गुणवंतराव पखाले**

मातोश्री अंजनाबाई मुंदाफळे समाजकार्य महाविद्यालय नरखेड, जि. नागपूर,

सवलग्नित राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर

**Email:** puroshotampakhale@gmail.com



**Manuscript ID**:

JRD -2025-171245

ISSN: 2230-9578

Volume 17

Issue 12(A)

Pp. 215-218

December 2025

**Submitted:** 19 Nov. 2025

**Revised:** 29 Nov. 2025

**Accepted:** 14 Dec. 2025

**Published:** 31 Dec. 2025



***गोषवारा***

*मराठी सामाजिक संस्कृती ही भारताच्या समृद्ध परंपरेचा अविभाज्य भाग आहे.महाराष्ट्राच्या समाजात विविध धर्म, जाती, प्रांतीय व भाषिक घटक एकत्र येऊन एकअद्वितीय सांस्कृतिक एकात्मता निर्माण करतात. संत परंपरेपासून चालत आलेली भक्तीचीभावना, समाजातील समानतेचा विचार आणि मानवतेचा संदेश हे मराठी संस्कृतीचेअधिष्ठान आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, आणि इतर संतांनी समाजाला बंधुभाव, परस्पर आदर आणि धर्मनिरपेक्षतेचे मूल्य दिले. लोककला, नाटक, संगीत, वाङ्मय आणि उत्सव यांमधून मराठी समाजाचे संस्कार व विचार दिसून येतात.*



***महत्वाचे बीज शब्द*** *- मराठी संस्कृती, कला, साहित्य, संत, नथ, ठुशी, कोल्हापुरी साज, धोतर, कुर्ता, फेटा पगडी टोपी*


## प्रस्तावना

मराठी सामाजिक संस्कृती ही भारताच्या वैविध्यपूर्ण संस्कृतीचा जिवंत आणि सशक्त भाग आहे. महाराष्ट्रातील समाजाने संत परंपरा, लोककला, श्रद्धा, विचार आणि सामाजिक मूल्यांच्या माध्यमातून एक अद्वितीय ओळख निर्माण केली आहे. समता, बंधुता आणि न्याय या तत्वांवर आधारलेली ही संस्कृती मानवतेचा संदेश देणारी आहे. भारतीय संविधानाने या संस्कृतीतील लोकशाही आणि सामाजिक न्यायाच्या विचारांना कायदेशीर रूप दिले आहे. म्हणूनच मराठी सामाजिक संस्कृती आणि भारतीय संविधान हे परस्परांना पूरक असून, एकत्रितपणे समाजाला प्रगती, एकता आणि मानवी मूल्यांचे मार्गदर्शन करतात.

## विषयाच्या अनुषंगाने मुख्य मुद्यांचे विश्लेषण : मराठी संस्कृती - एक समृद्ध आणि संपन्न वारसा

"मराठी संस्कृती" हा केवळ एक शब्द नाही, तर तो हजारो वर्षांचा इतिहास, गौरवशाली परंपरा, समृद्ध साहित्य, तेजस्वी विचार आणि आदरातिथ्याने भरलेल्या जीवनशैलीचा एक जिवंत प्रवाह आहे. महाराष्ट्र राज्याची ही संस्कृती सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांतून, गोदावरी-कृष्णेच्या प्रवाहातून आणि इथल्या माणसांच्या मनातून पिढ्यानपिढ्या वाहत आली आहे. शौर्य आणि संतपरंपरा या दोन टोकांना सहजतेने सामावून घेणारी ही संस्कृती परंपरा आणि आधुनिकता यांचा एक सुंदर संगम आहे.

## मराठी भाषा आणि साहित्य - संतांचे साहित्य संस्कृतीचा आत्मा

मराठी संस्कृतीचा पाया हा मराठी भाषा आहे. अभिजात भाषेचा दर्जा असलेली ही भाषा, संत साहित्यापासून ते आधुनिक साहित्यापर्यंत अत्यंत समृद्ध आहे.

महाराष्ट्रातील संत परमपरेतील सावता महाराजाविषयी म्हणतात, "सावता महाराज गृहस्थ धर्म सांभाळून परमार्थ साधना करीत होते संसारातून ते मनाने मुक्त होत होते प्रपंच शेतीभातील हे कधीच होते पण अंतरंग विठ्ठलमय होते प्रवास पद्माताच्या दिशेने चालला होता."[१]


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



**Address for correspondence:**

*डॉ. प्रा. पुरुषोत्तम गुणवंतराव पखाले, मातोश्री अंजनाबाई मुंदाफळे समाजकार्य महाविद्यालय नरखेड, जि. नागपूर, सवलग्नित राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर*



**How to cite this article:**

*पखाले, . पुरुषोत्तम . गुणवंतराव . (2025). मराठी सामाजिक संस्कृती आणि संविधान. Journal of Research & Development, 17(12(A)), 215–218.* https://doi.org/10.5281/zenodo.18385948

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI: 10.5281/zenodo.18385948

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

पृष्ठ क्र. १० संत ज्ञानेश्वर (ज्ञानेश्वरी) श्री संत ज्ञानेश्वर माऊली हे महाराष्ट्रातील आद्य साहित्याचे दैवत आहे. ज्ञानेश्वरच्या ज्ञानेश्वरी नुसार महाराष्ट्रातील सर्व साहित्य संकल्पना अस्तित्वात आलेल्या आहे. ज्ञानेश्वर माऊली हे महाराष्ट्रातील आद्य परंपरेचे आणि अध्यात्माचे दैवत समजले जाते. "संत ज्ञानेश्वर शंकराचार्यचा अद्वैताचा विचार घेतला पण परिस्थिती नुरूप त्यातल्या मानवतावादाचा त्याग करून आपल्या तत्त्वज्ञानास उपनिषदात्मक विचाराची अशी चिदविलासवादी भक्कम बैठक मिळवून दिली. त्यांच्या या सामाजिक कर्तुत्वाचा पुढील काळावर प्रभाव पडला."[२] पृष्ठ क्र. १८ संत तुकाराम (अभंग) संत तुकारामाच्या संदर्भात असे म्हटले जाते की, "ज्ञानेश्वर रचिला पाया, तुका झालासे कळस." हे मन महाराष्ट्रामध्ये आणि संपूर्ण संत प्रथम परी मध्ये अतिशय महत्त्वाची मानली जाते यामध्ये असे म्हटले आहे की संत ज्ञानेश्वर आणि महाराष्ट्रामध्ये संत परंपरेची जी पायाभरणी केली त्या अनुषंगाने संत परंपरेला महाराष्ट्रात महत्त्वाचे आणि अध्यात्म अतिउच्च स्थान निर्माण करून देणारे तुकाराम महाराज होते आणि त्यांच्या अभंगांनी अवघा महाराष्ट्र आजही दुमदुमत असताना पाहायला मिळतो. संत नामदेव, संत एकनाथ यांनी मराठी साहित्याचा पाया रचला. 'भेदाभेद अमंगळ' मानणारी वारकरी परंपरा ही मराठी संस्कृतीची खरी ओळख आहे.

**आधुनिक साहित्य: सण-उत्सव: चैतन्याचा अविष्कार**

महाराष्ट्रामध्ये वि. वा. शिरवाडकर यांना अनन्य साधारण महत्त्व असून त्यांच्या नावाने मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केल्या जातो. त्यामुळे महाराष्ट्राला त्यांच्या साहित्याचे योगदान काय होते ही परिस्थिती चांगल्या प्रकारची माहिती आहे. तेव्हा मराठी साहित्य महाराष्ट्रातील साहित्य केवळ शहरापुरते मर्यादित होते. आणि उच्च भ्रू-लोकांचे साहित्य मानल्या जात होते. परंतु गेल्या काही साहित्यामध्ये सर्व स्थरातून साहित्याची निर्मिती होत गेली. तसे साहित्याचे प्रकार पडत गेले. आधुनिक मराठी साहित्यामध्ये आणि साहित्यिकारांमध्ये अनेक प्रकारचे प्रकार आणि गत पडलेले दिसतात. याचा अर्थ महाराष्ट्रातील अनेक साहित्यिकांनी मराठी साहित्याला दिलेले योगदान मराठीला उच्च स्तरावर आणि जागतिक स्तरावर नेण्यात समर्थ झाले आहे. असे साहित्याचा अभ्यास केल्यानंतर वाटते.गोपाळ गणेश आगरकर म्हणतात, "गुरुमुख वाचन विचार अवलोकन वाद ई. ज्ञान संपादनाची अनेक द्वारे आहे. त्यापैकी वाचन हे अत्यंत महत्वाचे आहे."[३] पृष्ठ क्र. ७३ वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज), पु. ल. देशपांडे (पुल), वि. स. खांडेकर, विजय तेंडुलकर, अण्णाभाऊ साठे अशा अनेक साहित्यिकांनी मराठी साहित्याला जागतिक स्तरावर नेले.

मराठी संस्कृती सणांनी आणि उत्सवांनी भरलेली आहे, जे समाजाला एकत्र बांधून ठेवतात. गुढी पाडवा मराठी नववर्षाची सुरुवात. घरोघरी 'गुढी' उभारून या दिवसाचे स्वागत केले जाते. गणेश चतुर्थी हा महाराष्ट्राचा सर्वात मोठा आणि लोकप्रिय उत्सव आहे. लोकमान्य टिळकांनी याला सार्वजनिक स्वरूप दिल्यानंतर हा सण सामाजिक एकतेचे प्रतीक बनला. दिवाळी- दिवाळी पहाट, अभ्यंगस्नान आणि फराळ ही मराठी दिवाळीची खासियत आहे. आषाढी एकादशी (वारी) हा केवळ उत्सव नसून महाराष्ट्राची 'भक्ती परंपरा' आहे. पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी लाखो वारकरी पायी चालत जातात, हे दृष्य अद्भूत असते. मकर संक्रांत (तिळगुळ घ्या, गोड बोला), होळी-रंगपंचमी, दसरा, कोजागिरी पौर्णिमा हे सणही मोठ्या उत्साहात साजरे केले जातात.

**कला, संगीत आणि मनोरंजन आणि नृत्य:**

मराठी माणसाच्या रक्तातच कला भिनलेली आहे. रंगभूमी (नाट्य): मराठी संस्कृतीचा 'नाट्य' हा अविभाज्य भाग आहे. 'संगीत नाटक' हा तर मराठी रंगभूमीचा अनमोल ठेवा आहे. बालगंधर्व, अण्णासाहेब किर्लोस्कर ते आजच्या आधुनिक नाटकांपर्यंत ही परंपरा अविरत सुरू आहे. लावणी हा महाराष्ट्राचा सर्वात प्रसिद्ध लोकनृत्य प्रकार आहे, जो शृंगार आणि वीरश्रीचा मिलाप आहे. कविता अभंग पोवाडा यात वीर पुरुषांच्या कथा (उदा. शिवाजी महाराज) गायल्या जातात. कवितेच्या काही ओळी, भोंगा या कवितेत बळवंत भोयर म्हणतात, "तेव्हा वाटते चुकवावीत पाळीचे भोंगे, अन बंद पडावीत, कारखान्यातील घडयाळ शोषिकशिकांचे श्रमिकावरील दंगे, आणि उपटून टाकावा, तुझ्या माझ्यातला तिराईत मळ आसुसलेल्या पाळीच्या भोंगयातील एक कळ .."[४] पृष्ठ क्र. १२६ नाट्यसंगीत अभिजात संगीताचा एक अनोखा प्रकार. लोककला वारली चित्रकला गोंधळ, भारुड, आणि कीर्तन या लोककलांनी मराठी संस्कृतीला अधिक रंगतदार बनवले आहे. चित्रपटमध्ये दादासाहेब फाळके यांनी भारतीय चित्रपटसृष्टीचा पाया महाराष्ट्रातच घातला. मराठी चित्रपट हे आज वास्तववादी आणि दर्जेदार कथांसाठी ओळखले जातात.

**खाद्यसंस्कृती- चवींचा खजिना, वेशभूषा- परंपरेचा साज**

मराठी खाद्यसंस्कृती अत्यंत वैविध्यपूर्ण आहे. प्रदेशानुसार (कोकण, देश, विदर्भ, मराठवाडा) पदार्थांची चव आणि पद्धत बदलते. प्रसिद्ध पदार्थ- पुरण पोळी (सणासुदीचा गोड पदार्थ), वडा पाव (मुंबईची ओळख), मिसळ पाव (कोल्हापुरी/पुणेरी), पिठलं-भाकरी, थालीपीठ आणि झुणका भाकर. कोकण मासे, तांदळाची भाकरी आणि सोलकढी. विदर्भ तिखट आणि मसालेदार पदार्थ (उदा. सावजी मटण). फराळ दिवाळीत केले जाणारे चिवडा, लाडू, चकली, करंजी हे पदार्थ.

आज आधुनिक कपड्यांचा वापर सर्रास होत असला, तरी सणासुदीला पारंपरिक वेशभूषेलाच प्राधान्य दिले जाते. स्त्रिया- नऊवारी साडी (लुगडे), पैठणी (महावस्त्र), आणि पारंपरिक दागिने (उदा. नथ, ठुशी, कोल्हापुरी साज). पुरुष- धोतर, कुर्ता, फेटा (पगडी) किंवा टोपी. छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम आणि स्वराज्य स्थापना हा मराठी अस्मितेचा सर्वोच्च बिंदू आहे. सामाजिक सुधारणा

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

महाराष्ट्राला समाजसुधारकांची मोठी परंपरा लाभली आहे. महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठी संस्कृतीला पुरोगामी आणि विज्ञानवादी बनवले. माणुसकी- 'अतिथी देवो भव' (पाहुणचार) आणि साधेपणा ही मराठी माणसाची मुख्य ओळख आहे.

**मराठी संस्कृतीचा संविधानावरील प्रभाव**

मराठी संस्कृती आणि भारतीय संविधान यांच्यात एक अत्यंत खोल, ऐतिहासिक आणि अविभाज्य नाते आहे. हे नाते एकतर्फी नसून, या दोहोंनी एकमेकांना घडवले आहे आणि समृद्ध केले आहे. मराठी संस्कृतीने संविधानाला 'मूल्ये' दिली. महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेच्या चळवळीने संविधानाचा वैचारिक पाया रचला. संविधानाने मराठी संस्कृतीला 'संरक्षण' दिले. संविधानाने मराठी भाषा, अस्मिता आणि पुरोगामी विचारांना कायदेशीर चौकट आणि बळ दिले. भारतीय संविधानाची निर्मिती ही केवळ एक कायदेशीर प्रक्रिया नव्हती, तर ती एका सामाजिक क्रांतीची सुरुवात होती. या क्रांतीची वैचारिक बीजे महाराष्ट्राच्या पुरोगामी भूमीत रुजलेली होती.

"पंडित नेहरू भारताचे पंतप्रधान झाल्यावर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेले हिंदू कोड बिल अनेक वर्ष धूळ खात राहिले याचे कारण राजेंद्र प्रसाद वल्लभभाई पटेल यांचा विरोध वास्तविक या बिलात विवाह पुनर्विचार घटस्फोट यांना स्त्रियांच्या मालमत्तेचा व वारसा हक्क दत्तक इत्यादी गोष्टी होत्या."५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर (संविधानाचे शिल्पकार) संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वतः महाराष्ट्राच्या याच पुरोगामी संस्कृतीचे आणि संघर्षाचे प्रतीक होते. त्यांनी आयुष्यभर जो लढा दिला-अस्पृश्यता निवारण, सामाजिक समता, आणि मानवी हक्क-त्याच लढ्याचे प्रतिबिंब आपल्याला संविधानाच्या मूलभूत हक्कांमध्ये दिसते. समानता, स्वातंत्र्य, बंधुता(Preamble) संविधानाच्या प्रस्तावनेतील ही तीन मुख्य तत्त्वे महाराष्ट्रातील समाजसुधारकांनी आधीच जगली आणि रुजवली होती. म. जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले त्यांनी 'समानते'चा खऱ्या अर्थाने पाया रचला. स्त्री-शिक्षण आणि जातिभेदाविरुद्धचा त्यांचा लढा हाच संविधानाच्या कलम १४ (समानतेचा हक्क) आणि कलम १५ (भेदभावास मनाई) चा आत्मा आहे. राजर्षी शाहू महाराजः त्यांनी कोल्हापूर संस्थानात आरक्षणाची सुरुवात करून 'सामाजिक न्यायाची' संकल्पना प्रत्यक्षात आणली. हेच तत्त्व पुढे संविधानाने स्वीकारले. गोपाळ गणेश आगरकर यांचा 'बुद्धीप्रामाण्यवाद'आणि 'अभिव्यक्ती स्वातंत्र्या'चा ध्यास, हाच संविधानाने दिलेल्या 'वैज्ञानिक दृष्टिकोन' आणि 'कलम १९' (भाषण स्वातंत्र्य) चा आधार आहे. लोकमान्य टिळकांची 'स्वराज्य' गर्जना "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे," ही टिळकांची घोषणा म्हणजे केवळ राजकीय स्वातंत्र्य नव्हते, तर ती 'लोकशाही' आणि 'प्रजासत्ताकाची' सांस्कृतिक मागणी होती, जी संविधानाने पूर्ण केली.

**संविधानाचा मराठी सामाजिक संस्कृतीवरील प्रभाव**

संविधानाने केवळ महाराष्ट्राच्या विचारांचा स्वीकार केला नाही, तर त्याबदल्यात मराठी सामाजिक संस्कृतीच्या संरक्षणाची आणि वाढीची हमीसुद्धा दिली. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती आहे. भारतीय संविधानातील 'कलम ३' नुसार 'भाषावार प्रांतरचना' शक्य झाली. याच घटनात्मक अधिकाराच्या आधारे मराठी जनतेने 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ' लढली. १०६ हुतात्म्यांच्या बलिदानानंतर, १ मे १९६० रोजी 'महाराष्ट्र' या मराठी भाषिक राज्याची निर्मिती झाली. संविधानामुळेच मराठी संस्कृतीची ही एकसंध राजकीय ओळख निर्माण होऊ शकली. भाषा आणि साहित्याचे संरक्षण संविधानाच्या आठव्या अनुसूचीमध्ये 'मराठी' भाषेला अधिकृत भाषेचा दर्जा दिला गेला आहे. यामुळे मराठी भाषेचे शिक्षण, साहित्य आणि प्रशासकीय वापर यांना घटनात्मक संरक्षण मिळाले आहे.

कला आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य महाराष्ट्रात पहावयास मिळते. मराठी संस्कृतीचा एक मोठा भाग म्हणजे तिची रंगभूमी (नाट्य), साहित्य आणि लोककला (उदा. लावणी, पोवाडा). संविधानाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यामुळे (अनुच्छेद १९ ) ही कला जिवंत राहिली आणि बहरली. याच स्वातंत्र्याचा वापर करून मराठी साहित्याने आणि नाटकांनी अनेकदा प्रस्थापित व्यवस्थांवर परखड टीका केली आहे (उदा. विजय तेंडुलकरांची नाटके). वारकरी परंपरेचे रक्षण करते. संविधानाने दिलेल्या 'धर्मनिरपेक्षतेच्या' तत्त्वामुळे महाराष्ट्रातील 'सर्वधर्म समभावाची' महान वारकरी परंपरा अधिक बळकट झाली. पंढरपूरची वारी हे केवळ धार्मिक नाही, तर एक मोठे सांस्कृतिक आणि सामाजिक एकत्रीकरण आहे, जे संविधानाच्या 'बंधुता' या मूल्यालाच पुढे नेते.

**सारांश**

मराठी संस्कृती आणि संविधान हे वेगळे एक अतूट नाते आहेत. मराठी संस्कृतीने संविधानाला आत्मा दिला, तर संविधानाने त्या आत्म्याच्या संरक्षणासाठी कायदेशीर चौकट पुरवले. महाराष्ट्राची पुरोगामी मूल्ये हीच संविधानाची मूल्ये आहेत. त्यामुळेच, संविधानाचे रक्षण करणे हे प्रत्येक मराठी माणसाचे केवळ 'नागरिक कर्तव्य' नसून ते एक 'सांस्कृतिक कर्तव्य' देखील आहे.

**निष्कर्ष**

- मराठी सामाजिक संस्कृती ही एका नदीसारखी आहे, जी काळाच्या ओघात अनेक प्रवाह स्वतःत सामावून घेत पुढे जात आहे. ती संत तुकारामांच्या अभंगांइतकी साधी, तर शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याइतकीच धोरणी आहे.
- पु.ल. देशपांडेंच्या विनोदासारखी निर्मळ, तर लता मंगेशकरांच्या सुरांसारखीच अजरामर आहे. हा समृद्ध वारसा जपणे आणि तो पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे हीच मराठी संस्कृतीची खरी ताकद आहे.
- संविधानाने समाजात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाची हमी दिली प्रबोधानचे प्रणेते असून मराठी समाजातील लोकशाही मूल्यांना दिशा दिली आहे. अशा रीतीने मराठी सामाजिक संस्कृती आणि भारतीय संविधान हे एकमेकांना पूरक असून समाजात सौहार्द, प्रगती आणि एकात्मतेचा संदेश देतात.
- भारतीय संविधान या सामाजिक संस्कृतीचे संरक्षण आणि संवर्धन करते. संविधानातील प्रास्ताविकेत दिलेले स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय हेच मराठी संस्कृतीतील जीवनमूल्यांचे रूपांतर आहे.
- धर्मस्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि समानतेचे अधिकार समाजातील विविध घटकांना एकत्र बांधतात.

**आधारभूत ग्रंथ**

१- ज्ञानेश्वरी
२- संविधान
३- महाराष्ट्रातील समाज प्रबोधानांचे प्रणेते

**संदर्भ ग्रंथ**

1. महाराष्ट्रातील समाज प्रबोधानांचे प्रणेते- प्राचार्य चंद्रकांत घुमटकर, स्नेह वर्धन प्रकाशन पुणे – २००७ पृष्ठ क्र.१०
2. तंत्रेव – पृष्ठ क्र. १८
3. भाषावैभव भाग -१ राघव पबळीसहर्ष & डिस्ट्रीबुटर्स नागपूर, पृष्ठ क्र. ७३
4. तंत्रेव - पृष्ठ क्र. १२६
5. फुले आंबेडकर आणि स्त्री मुक्ती चळवळ –डॉ. ज्योती लांजेवार संकेत प्रकाशन नागपूर. २००८, पृष्ठ क्र. ३९